# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.12.2024** **वार – शनिवार**

---

**अधिवेशन**

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाचा आज पहिला दिवस होता. विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी कामकाजाचं संचालन केलं. विधानसभेच्या अध्यक्षांची निवड येत्या 9 तारखेला होणार असून यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याची वेळ रविवारी दुपारी बारा वाजेपर्यंत ठरवण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली. यानंतर चैनसुख संचेती, जयकुमार रावल, माणिकराव कोकाटे आणि आशीष जयस्वाल या सदस्यांना शपथ देण्यात आली. हे चौघे कोळंबकर यांच्यासोबत तालिका सदस्य म्हणून कामकाज पाहतील. त्यापाठोपाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ देण्यात आली. इतर आमदारांच्या शपथविधीनंतर सभागृहाचं आजचं कामकाज स्थगित करण्यात आलं. उद्या उर्वरित नवनिर्वाचित आमदारांना शपथ देण्यात येईल.

**मृदा**

शेतकऱ्यांनी जमिनीच्या आरोग्याचं महत्त्व समजून घेऊन राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत जमिनीची आरोग्य पत्रिका तयार करण्यासाठी माती परीक्षण करावं आणि माती तपासणी अहवालानुसार पिकांना संतुलित तसंच योग्य खतं वापरावीत, असं आवाहन पुणे  कृषी पर्यवेक्षक मेघराज वाळुंजकर यांनी केलं आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत ‘जागतिक मृदा दिन’ पुण्यात साजरा करण्यात आला, यावेळी जागतिक मृदा दिनाचे महत्त्व विशद करताना वाळुंजकर बोलत होते.  जमिनीचं आरोग्य व्यवस्थापन करताना जमिनीतील सेंद्रिय कर्ब, उपयुक्त सुक्ष्म जिवाणूंचं संवर्धन, पिकांचा फेरपालट, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक कीड रोग नियंत्रण, सेंद्रिय आणि जैविक खतांचा वापर, सुक्ष्म अन्नद्रव्यांचं पीक उत्पादनामधील महत्त्व, जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्यांचं व्यवस्थापन या विषयावर उपस्थित शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना जमिन आरोग्य पत्रिकांचं वाटप करण्यात आलं.

**रक्तदान**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 68 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रुग्ण हक्क परिषदेनं आंबेडकरी विचारांचा जागर या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. यामध्ये सलग 24 तास आंबेडकरी विचारांचा जागर करीत अभिवादन करण्यात आलं. तसंच रक्तदान शिबिरात 715 पिशव्या रक्त संकलन करण्यात आलं.  रक्तदानासारखा दुसरा चांगला उपक्रम नाही, या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, भीमगीतांची मैफल, व्याख्यानांमुळं आंबेडकरांचं जीवन नव्या पिढीपर्यंत पोहोचत आहे असं रुग्ण हक्क परिषदेचे प्रमुख उमेश चव्हाण याप्रसंगी बोलताना म्हणाले.

**तोटा**

2023-24 या वर्षात पीएमपीएमएलचा संचलन तोटा  706 कोटी 88 लाख रुपये झाला आहे. पीएमपीपीएमएलकडून पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए हद्दीत प्रवासी सेवा दिली जाते. दैनंदिन 12 ते 13 लाख प्रवासी त्याद्वारे प्रवास करतात. यातून मिळणारं उत्पन्न आणि होणारा खर्च याचा ताळमेळ बसत नसल्यानं हा संचलन तोटा दिवसेंदिवस वाढत आहे.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध प्रकल्प आणि उपक्रमांना पुणे स्मार्ट सिटी विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी भेट दिली. आव्हाळे यांनी मोशी इथला कचऱ्यापासून उर्जानिर्मिती आणि बायोगॅस प्रकल्प, बांधकाम राडारोडा प्रक्रिया केंद्र, तसंच घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांना भेट दिली. नव्यानं उभारण्यात आलेल्या दिव्यांग भवनाचीही माहिती त्यांनी घेतली.

**बालरंगभूमी**

बालरंगभूमी परिषदेचं 'बालरंगभूमी संमेलन' पुण्यात बिबवेवाडी इथल्या अण्णाभाऊ साठे स्मारकात 20,21 आणि 22 डिसेंबरला आयोजित करण्यात येणार आहे, अशी घोषणा बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलम शिर्के-सामंत यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत केली. बालरंगभूमी संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांचं नाव निश्चित झालं असून, संमेलनाचं उद्घाटन ज्येष्ठ अभिनेते डॉक्टर मोहन आगाशे यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, सयाजी शिंदे, अजित भुरे, चित्रपट प्रमाणपत्र मंडळाचे अध्यक्ष विजय गोखले, सविता मालपेकर, सुबोध भावे यांच्यासह नाट्य आणि बालनाट्य क्षेत्रातल्या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. बालरंगभूमी संमेलन समारोप आणि पुरस्कार सोहोळा 22 डिसेंबरला सायंकाळी पाच वाजता होणार असून यावेळी बालरंगभूमी परिषद पुरस्कार ज्येष्ठ नाट्यकर्मी प्रतिभा मतकरी यांना देण्यात येणार आहे.

**संगीत-रंगभूमी**

स्वातंत्र्यपूर्व काळात अन्योक्तीपूर्ण नाटकांची परंपरा होती. संगीत नाटकांमधून केवळ मनोरंजनच नव्हे तर प्रबोधनही होत असे, आज मराठी संगीत रंगभूमीची स्थिती पूर्वीसारखी वैभवशाली राहिलेली नाही असं मत ज्येष्ठ विचारवंत उल्हास पवार यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. शिलेदार कुटुंबियांनी मराठी रंगभूमी, पुणेच्या माध्यमातून संगीत रंगभूमी जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे तसंच इतरही कलाकार संगीत रंगभूमीची परंपरा प्रवाहित ठेवण्याचा कसोशिनं प्रयत्न करीत आहेत, त्यांना लोकाश्रय मिळावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. मराठी रंगभूमी, पुणे या संस्थेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित स्नेहमेळाव्यात पवार बोलत होते. संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षात सहभागी झालेल्या तंत्रज्ञ आणि कलाकारांचा सन्मान तसंच संस्थेच्या गौरविकेचं प्रकाशन पवार यांच्या हस्ते करण्यात आलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**